जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

6-7 MAY 2016

आदित्य वेल्हाळ



**लोकराजाला अभिवादन :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोल्हापूर महापालिका तसेच शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट यांच्या वतीने शुक्रवारी सकाळी साडेआठ वाजता दसरा चौक येथील त्यांच्या पुतळ्यास महापौर अश्विनी रामाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कादर मलबारी, कृष्णात हारुगडे, रियाज सुभेदार, मुस्लिम बोर्डिंगचे गणी आजरेकर, प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे, पुरवठा अधिकारी विवेक आगवणे, राजदीप सुर्वे, वसंतराव मुळीक, युवराज कदम उपस्थित होते. यानंतर अश्विनी रामाणे आणि डॉ. अमित सैनी यांनी राजर्षी शाहू स्मारक भवन येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्यासही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तरुण भारत

7 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मटा अँकर **विद्यापीठातील संशोधनाची अमेरिकन व युरोपियन जर्नलमध्ये नोंद**

# शंखपुष्पीतून वाढते हिमोग्लोबिन

Maruti.Patil
@timesgroup.com

**कोल्हापूर :** शंखपुष्पी वनस्पतीची पाने आणि फुलांचे रोज सेवन केल्यास महिलांमधील . हिमोग्लोबिन आणि कॅल्शियमचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढते, असे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने केले आहे. या प्रयोगावर अधारित संशोधन पेपर अमेरिकन व युरोपियन जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे. आहारातील कमी प्रथिनांमुळे अनेकांमध्ये हिमोग्लोबिन व कॅल्शियमचे प्रमाण कमी असते. विशेषत: १२ ते ४० वयोगटातील मुली व महिलांमध्ये ही समस्या दिसून येते. यावर शंखपुष्पीचा चांगला उपयोग होतो.

शंखपुष्पी वनस्पती सर्वत्र आढळते. आयुर्वेदामध्ये तिची मुळे, बीया आणि पानांचा ब्रेन टॉनिक म्हणून वापर केला जातो. हे महत्त्व ओळखून वनस्पतीशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका वर्षा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाती देशमुख यांनी संशोधन पेपर तयार केला. तो अमेरिकन जर्नल 'फार्मासिटीकल रिसर्च'मध्ये 'स्टडीज ऑफ क्लायटोरिया टर्नेटिया' नावाने तर युरोपियन जर्नल ऑफ एक्स्प्रेमिंटल प्रायव्होजन- २०१४ मध्ये 'हिमॅटोलॉजिकल पॅरॉमिटकल ऑफ इंडियन गोट्स पेड ड्राइड टायटेरिया यूज बेस्ड डाएट' नावाने प्रसिद्ध झाला आहे.

या वनस्पतीची कोवळी पाने खाल्यास हिमोग्लोबिन वाढते. जास्त दिवसांच्या पानांचे चूर्ण घेतल्यास कॅल्शियम व हिमोग्लोबिन वाढत असल्याचा निष्कर्ष देशमुख यांनी काढला आहे. कॅल्शियम, आयर्न, झिंक, पोटॅशियम या मूलद्रव्यांसोबत मोठ्या प्रमाणात 'अ' व 'ब' जीवनसत्व असल्याचेही आढळून आले आहे. पानामधील क्युरासिटीन घटक फुप्फुसाच्या कॅन्सरवर गुणकारी असल्याचा निष्कर्ष काढला आहे. गायी व शेळ्यांना चारा म्हणून तिचा वापर केल्यास दूध उत्पादनातही भरपूर वाढ होईल, असाही दावा देशमुख यांनी केला आहे.



## असे झाले संशोधन

शंखपुष्पीचे औषधी गुणधर्म ओळखण्यासाठी शेळ्यांवर प्रयोग केले. चार किलोच्या प्रत्येकी तीन शेळ्यांचे तीन ग्रुप करण्यात आले. पहिल्या व दुसऱ्या ग्रुपला प्रत्येकी २५० ग्रॅम पाने व एका ग्रुपला दहा ग्रॅम निळ्या व पांढऱ्या फुलांचे चूर्ण देण्यात आले. तिसऱ्या ग्रुपला गव्हाचा भरडा देण्यात आला. प्रयोगा दरम्यान पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये पहिल्या दोन्ही ग्रुपमध्ये हिमोग्लोबिन व कॅल्शियम वाढल्याचे दिसून आले.

**सह्याद्री किंवा अन्य पठारी भागात आढळणाऱ्या औषधी वनस्पतींचे पारंपरिक ज्ञान घेऊन त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात करता येतो. अशा प्रकारच्या औषधी वनस्पतींच्या ज्ञानाचे संकलन करणे गरजेचे आहे. विभागाने अशा ४०० वनस्पतींचे डाक्युमेंटेशन केले आहे.**

**- प्रा. वर्षा जाधव,**
**वनस्पतीशास्त्र विभाग**



तरुण भारत

7 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पथदर्शी जैव उर्जा प्रकल्प उभारण्याचा मानस

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : जैव ऊर्जा व कचरा व्यवस्थापनावर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारावर पर्यावरण सुसंगत व प्रदूषणविरहित प्रकल्पांची उभारणी करणे ही काळाची गरज आहे. विद्यापीठातही जैव-ऊर्जा व कचरा व्यवस्थापनावर आधारित आधुनिक पथदर्शी प्रकल्प राबविण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (मुंबई) आणि चाणक्य इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक लीडरशीप (सीआयपीएल, मुंबई) यांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठात गुरूवारी 'जैव-ऊर्जा व कचरा व्यवस्थापन' या विषयावर चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, स्थानिक उद्योगांना अद्यावत ज्ञान व तंत्रज्ञान अवगत करुन देण्याबरोबरच त्यांच्याशी संवाद वाढविण्यासाठी विद्यापीठ सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे. उद्योगांना अत्यंत उपयुक्त ठरेल, अशा पद्धतीने सेंटर ऑफ एक्सलन्स विद्यापीठात असावे. या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. इनक्युबेशन सेंटरच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने असे अनेक प्रयत्न केले जाणार आहेत. याचा विद्यापीठ परिक्षेत्रातील स्थानिक उद्योगांना लाभ होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या उद्योजकांच्या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना सीआयपीएलचे संचालक रणजीत शेट्टी. सोबत डॉ. ज्योती जाधव, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

सीआयपीएलचे संचालक रणजीत शेट्टी यांनी 'ग्रीन वेस्ट टू सॉलिड फ्युएल टू पॉवर' या विषयावर मार्गदर्शन केले. शेट्टी म्हणाले, सीआयपीएलच्या माध्यमातून सुप्रशासनाशी संबंधित मार्गदर्शन करण्याबरोबरच कचऱ्यातून संपत्तीची निर्मिती करण्याचे ध्येय बाळगून अनेक प्रकारचे संशोधन करण्यात येत आहे. विशेषत: खेड्यांमध्ये चुलीच्या धुरामुळे महिलांना आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यासाठी प्रदूषणविरहित आणि किफायती तंत्रज्ञान निर्माण करण्यात येत आहे.

पुण्याच्या प्रायमोव्ह इंजिनिअरिंगच्या राजेश दाते यांनी 'ग्रो रेसिड्यू टू बायो-सीएनजी' या विषयावर व्याख्यान झाले. शेतीमधील टिकाऊ कचऱ्यापासून जैव-इंधन निर्मिती करता येणे शक्य असून त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करता येऊ शकते. देशातील एकूण जमिनीवर उपलब्ध लँडमासपैकी २५ ते ३० टक्के जरी आपण वापरात आणू शकलो, तर क्रूड ऑईलची शंभर टक्के आयात बंद करता येऊ शकेल, असेही त्यांनी सांगितले.

पुण्याच्या गंगोत्री इको टेक्नॉलॉजीच्या संतोष गोंधळेकर म्हणाले, घनकचऱ्याबरोबरच ओल्या कचऱ्याची समस्या ही आता सर्वच शहरांची समस्या होऊ पाहत आहे. त्यावरही संशोधनाच्या सहाय्याने प्रक्रिया करून शंभर टक्के पर्यावरणपूरक व प्रदूषणविरहित तंत्रज्ञान विकसित केले, असून देशाला कचऱ्याच्या समस्येपासून मुक्ती देण्याची त्याची निश्चिती क्षमता असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी केआयटीचे सचिन मेनन, एस. पी. सुतार, अजय मस्के, एन. एम. शिंदे, अनिल काळे, मेधा कुलकर्णी, कुलदीप पाटील, कुशल गोस्वामी, पल्लवी कोरगावकर आदी उपस्थित होते.

पुढारी 17 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैव-ऊर्जा प्रकल्प राबविणार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; 'जैव-ऊर्जा व कचरा व्यवस्थापन'वर चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारावर पर्यावरण सुसंगत व प्रदूषणविरहित प्रकल्पांची उभारणी करणे ही काळाची गरज आहे. विद्यापीठातही जैव-ऊर्जा व कचरा व्यवस्थापनावर आधारित आधुनिक पथदर्शी प्रकल्प राबविण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (मुंबई) आणि चाणक्य इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक लीडरशीप (सीआयपीएल) यांच्या सहकार्याने विद्यापीठात आज 'जैव-ऊर्जा व कचरा व्यवस्थापन' या विषयावर विशेष चर्चासत्रात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, स्थानिक उद्योगांना अद्ययावत ज्ञान व तंत्रज्ञान यांच्यासंदर्भात अवगत करण्याबरोबरच त्यांच्याशी संवाद वाढविण्यासाठी उपक्रम राबवीत आहे. उद्योगांना अत्यंत उपयुक्त ठरेल, असे सेंटर ऑफ एक्सलन्स विद्यापीठात असावे, या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. इनक्युबेशन सेंटरच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने पावले उचलण्यात येणार आहेत.




'सीआयपीएल'चे संचालक रणजित शेट्टी यांचे 'ग्रीन वेस्ट टू सॉलिड फ्युएल टू पॉवर' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, खेड्यांमध्ये चुलीच्या धुरामुळे महिलांना आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यासाठी प्रदूषणविरहित आणि किफायती तंत्रज्ञान निर्माण करण्यात येत आहे. पुण्याच्या प्रायमोव्ह इंजिनिअरिंगच्या राजेश दाते यांचे 'ॲग्रो रेसिड्यू टू बायो-सीएनजी' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी शेतीमधील टाकाऊ कचऱ्यापासूनही जैव-इंधन निर्मिती करता येणे शक्य असून त्या माध्यमातून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करता येऊ शकते, असे सांगितले.

पुण्याच्या गंगोत्री इको टेक्नॉलॉजीच्या संतोष गोंधळेकर यांनी 'वेट वेस्ट टू सीएनजी लिक्विड फर्टिलायझर अँड ब्रिक्वेटस्' या विषयावर मार्गदर्शन केले. घनकचऱ्याबरोबरच ओल्या कचऱ्याची समस्या ही आता सर्वच शहरांची समस्या आहे. त्यावरही संशोधनाच्या साह्याने प्रक्रिया करून शंभर टक्के पर्यावरणपूरक व प्रदूषणविरहित तंत्रज्ञान विकसित केले आहे. देशाला कचऱ्याच्या समस्येपासून मुक्ती देण्याची त्याची निश्चित क्षमता असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. ज्योती जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. चर्चासत्रास सचिन मेनन, एस. पी. सुतार, अजय मस्के, एन. एम. शिंदे, अनिल काळे, मेधा कुलकर्णी, कुलदीप पाटील, कुशल गोस्वामी, पल्लवी कोरगावकर यांच्यासह कोल्हापूर मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष एस. बी. पवार, विविध साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शासकीय प्रतिनिधी, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

पुढारी

7 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आप्पासाहेब पवार 'मॅन ऑफ क्रायसिस'

## डॉ. अरुण भोसले; आजी-माजी विद्यार्थी मेळावा; गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या कारकिर्दीवर नजर टाकली असता ते 'मॅन ऑफ क्रायसिस' अर्थात कोणत्याही पेचप्रसंगातून मार्ग काढण्याचे त्यांचे कौशल्य वादातीत होते, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ विचारवंत डॉ. अरुण भोसले यांनी काढले.

डॉ. पवार यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीतर्फे आयोजित विद्यार्थी भवन 'कमवा व शिका' योजनेंतर्गत शिक्षण घेतलेल्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा व पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. भोसले म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार यांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाचे योगदान होते. एक शिक्षक, प्राध्यापक म्हणून आप्पासाहेबांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होते. महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी



कोल्हापूर : डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीतर्फे आयोजित आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा व पुरस्कार वितरण समारंभात गुणवंत विद्यार्थी दत्तात्रय सवदे यास पारितोषिक प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. बी. एल. पाटील, प्राचार्य डॉ. संभाजीराव कणसे, प्रा. टी. के. सरगर आदी.

मुंबई प्रांताचे शिक्षण संचालक म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई आणि शिक्षण संचालक डॉ. आप्पासाहेब पवार या त्रिकुटाने महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला दिशा देण्यासाठी परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नानेच शिवाजी विद्यापीठ स्थापनेस मूर्त रूप मिळाले. त्याला दिशा देण्याची जबाबदारीही आप्पासाहेबांनी खांद्यावर घेतली, हे त्यांचे विद्यापीठावर उपकार आहेत, अशी कृतज्ञता डॉ. भोसले यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थी हा राष्ट्राचा ठेवा आहे, या भावनेतून आप्पासाहेबांनी विद्यापीठाच्या वाटचालीची दिशा कार्यातून आखून दिलेली आहे. त्यांच्या विचारांचा वारसा, श्रमसंस्कारांची शिदोरी घेऊन वाटचाल करणारा कोणताही विद्यार्थी आयुष्यात कधीही अयशस्वी होणार नाही. प्राचार्य डॉ. बी. एल. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. टी. के. सरगर यांनी परिचय करून दिला. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी आभार मानले. यावेळी डॉ. बी. एल. पाटील, प्राचार्य डॉ. संभाजीराव कणसे यांच्यासह विद्यार्थी भवनचे आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थी भवनच्या आदर्श व गुणवतं विद्यार्थी-विद्यार्थिनींना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यात दत्तात्रय सवदे (एम. कॉम. भाग-२) आदर्श विद्यार्थी ठरले. आसमा सय्यद (एम. ए. भाग-२) आदर्श विद्यार्थिनी ठरल्या. अन्य गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये भाषा विभाग : नमिता गावडे, समाधान गायकवाड, सामाजिक शास्त्र : आसमा सय्यद, संभाजी करडे, विज्ञान : रेश्मा बाबर, भगवान पाटील, वाणिज्य : रेवणनाथ नवले, राहुल बेळंके.

सकाळ

7 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# डॉ. आप्पासाहेब पवार 'मॅन ऑफ क्रायसिस'

## डॉ. अरुण भोसले : कमवा शिका योजनेतील विद्यार्थ्यांचा मेळावा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : "शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचे 'मॅन ऑफ क्रायसिस' अर्थात कोणत्याही पेचप्रसंगातून मार्ग काढण्याचे कौशल्य वादातीत होते," असे प्रतिपादन प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी आज केले. डॉ. पवार यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीच्या वतीने आयोजित विद्यार्थी भवनमधून 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत शिक्षण घेतलेल्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा मेळावा व पुरस्कार वितरण अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. भोसले म्हणाले, 'एक शिक्षक, प्राध्यापक म्हणून आप्पासाहेबांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होतेच; पण महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे प्रशासक म्हणूनही त्यांची कारकीर्द संस्मरणीय ठरली. महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी मुंबई प्रांताचे शिक्षण संचालक म्हणून त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. ही त्यांची कारकीर्द खरे तर शिक्षण क्षेत्राचे सुवर्णयुगच म्हणायला हवे.



या काळात त्यांनी पाचवीपासून ऐच्छिक इंग्रजी अभ्यासक्रमाची सुरवात केली. शैक्षणिकदृष्ट्या मागास विदर्भ-मराठवाड्याला या क्षेत्रात पुढे आणण्यासाठी अक्षरशः जिवाचे रान केले. विदर्भातील सुमारे ३५० तर मराठवाड्यातील १३१ गावांना झंझावाती भेटी देऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या विभागाच्या शैक्षणिक विकासासाठी पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षित लोकांनी पुढाकार घ्यावा, अशी त्यांची तळमळ होती. त्यातूनच मराठवाड्यात रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे याच महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत, हा या दोन कुलगुरूंना जोडणारा एक महत्त्वाचा धागा आहे."

डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यार्थी हा राष्ट्राचा ठेवा आहे, या भावनेतून आप्पासाहेबांनी विद्यापीठाच्या वाटचालीची दिशा त्यांच्याच कार्यातून आखून दिलेली आहे. आज विद्यापीठ नॅक रँकिंगमध्ये राज्यात पहिले, एनआयआरएफ रँकिंगमध्ये देशात २८ वे तर राज्यात पहिले, ऑनलाइन संदर्भ पाहण्यात देशात दुसरे अशी यशाची अनेक शिखरे काबीज करत आहे. या मागे आप्पासाहेबांनी केलेली पायाभरणीच कारणीभूत आहे, याची कृतज्ञ जाणीव आपण सदोदित मनी बाळगली पाहिजे."

या वेळी विद्यार्थी भवनच्या आदर्श व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना डॉ. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यामध्ये दत्तात्रय निवृत्ती सवदे (एम.कॉम. भाग-२) आदर्श विद्यार्थी, तर आसमा अहमद सय्यद (एम.ए. भाग-२) आदर्श विद्यार्थिनी ठरली.

अन्य गुणवंत असे : भाषा विभाग- नमिता गावडे, समाधान गायकवाड, सामाजिक शास्त्र- आसमा सय्यद, संभाजी करडे, विज्ञान- रेश्मा बाबर, भगवान पाटील, वाणिज्य- रेवणनाथ नवले, राहुल बेळंके.

सुरवातीला प्राचार्य भैरव कुंभार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉ. बी. एल. पाटील, प्राचार्य डॉ. संभाजीराव कणसे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत 7 MAY 2016 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पंचसूत्रीच्या माध्यमातून यशस्वी उद्योजक होणे शक्य'

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

गुणवत्ता, कौशल्य, आत्मविश्वास, बाजाराचा शोध आणि उपलब्ध संधी या पंचसूत्रीच्या जोरावर यशस्वी उद्योजक होणे शक्य आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उप–सरव्यवस्थापक अशोक मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उप–सरव्यवस्थापक अशोक मोरे हे होते.

यावेळी अशोक मोरे म्हणाले, बँकांच्या माध्यमातून निधी, पतपुरवठा करण्यात तांत्रिक अडचणी उद्भवतात. अशा इच्छुक, गरजू व्यक्तींना आर्थिक मदत करण्याचे काम महामंडळ करते. महामंडळाचा मुख्य उद्देश तळागाळातील सर्व लोकांना समान हक्क प्रदान करण्याचे आहे.

एम.आय. गरोदिया म्हणाले. अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांमधूनच यशाचा जन्म होतो. प्रत्येकाच्या वेदनांचा विचार करणाराच जीवनात यशस्वी उद्योजक होतो.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे यांचे भाषण झाले. स्वागत व प्रास्ताविक कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव यांनी तर आभार सचिन जाधव यांनी मानले. बँक ऑफ इंडियाचे एम. जी.कुलकर्णी, उद्योजक संग्राम पाटील, एस.डी. शेळके, वनिता पाटील यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Times of India 6.7 MAY 2016

# Varsity keen on bio-energy plant on campus

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Vice-chancellor of Shivaji University, Kolhapur (SUK) Devanand Shinde has said that the varsity is keen on setting up a bio-energy plant on the university campus.

Speaking on Thursday at a bio-energy workshop held at SUK, Shinde said there is need to set up eco-friendly, advanced, technologically sound and pollution-free bio-energy plants. The university is keen on setting up such bio-energy and waste management project on its campus," he said.

Shivaji University, in association with Institute of Chemical Technology, Mumbai, and Chanakya Institute of Public Leadership (CIPL) had organised the workshop. Shinde said that the university is regularly conducting events which will assist local talent and technology. "Communicating with this talent is one of the main concerns of the university. The university may set up a centre of excellence in the coming days," said the vice-chancellor.

Ranjit Shetty of CIPL said they are researching the various aspects of the waste management. "We are working on a technique of pollution-free and affordable cooking technique for remote areas," he said.

Rajesh Date of Primove Engineering said that it is possible to generate bio-fuel from the agro waste. "If we could use even 25-30% land for this purpose we will be able to curb the import of crude oil. The technique could help farmers financially too," he said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

7 MAY 2016

# समाजशास्त्र विभाग प्रमुखपदी डॉ. कराडे

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभाग प्रमुखपदी डॉ. जंगन कराडे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रा. आर. बी. पाटील यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदावर डॉ. कराडे यांनी नियुक्ती झाली आहे.

भारतातील समकालीन सामाजिक समस्यांचा शास्त्रीय पद्धतीने वेध घेवून त्यांची मांडणी करणाऱ्या महत्त्वाच्या समाजशास्त्रज्ञांमध्ये डॉ. कराडे यांचा समावेश होतो. आरक्षण धोरण आणि वास्तव, धम्मक्रांतीची फलश्रुती, राष्ट्रवादी



डॉ. जगन कराडे

डॉ. आंबेडकर, जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने, वंचितांचे समूह : स्वरुप आणि समस्या या मराठी ग्रंथाबरोबरच 'ऑक्युपेशनल मोबिलिट अमंग शेड्युल्ड' आणि 'डेव्हलपमेंट ऑफ शेड्यूल्ड कास्ट अँड शेड्यूल्ड ट्राइब्ज इन इंडिया' हे त्यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ केंब्रिज स्कॉलर प्रकाशनातर्फे प्रकाशित झाले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज्, सिमला या संस्थेची फेलोशिप त्यांना मिळाली आहे.